**नियमित दिवाणी दावा नं. १३५/२००५**

**निशाणी क्र. १०८ वरील आदेश**

**सी.एन.आर.क्र. MHK0110009812005**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी कागदपत्रे हजर करण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, त्यांना काही महत्वाची कागदपत्रे हजर करण्याची आहेत. प्रस्तुत दाव्याचा गुणदोषावर न्यायनिर्णय होण्यासाठी सदर कागदपत्र न्यायाचे दृष्टीने गरजेचे आहेत. ते हजर करून मिळणेसाठी प्रतिवादी यांनी परवानगी मागितली आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादी यांनी आपले म्हणणे दाखल करून तिव्र विरोध दर्शविलेला आहे. वादी यांचे कथनाप्रमाणे प्रतिवादी यांनी प्रस्तुतचे कागदपत्र हे त्यांचा पुरावा संपलेनंतर जवळ जवळ ३ वर्षांनी दाखल केलेले आहेत. वादी पुढे कथन करतात की, सदर कागदपत्रांचा प्रस्तुत दाव्याशी कोणताही संबंध नाही. प्रतिवादी केवळ प्रस्तुत दाव्याचे काम लांबविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे अर्ज देत आहेत. प्रतिवादी यांना अशाप्रकारे कागदपत्र हजर करता येणार नाहीत. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खरर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

४. प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील वादी यांचे म्हणणे व संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

५. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ८ नियम १(अ) अन्वये प्रतिवादी यांनी ज्या कागदपत्राच्या आधारे आपला बचाव करत आहेत किंवा ज्या कागदपत्रांचा त्यांनी दाव्याकामी बचाव करित असताना आधार घेतलेला आहे त्या कागदपत्रांपैकी जे कागदपत्र प्रतिवादी यांचे ताब्यात किंवा नियंत्रणात असतील ते कागदपत्र प्रतिवादी यांनी कैफियतीसोबतच दाखल करण्याचा पहिला टप्पा आहे.

सर्वसाधारणपणे नियम असा आहे की, वादी व प्रतिवादी यांनी दावा प्रकरणात न्यायालयाने वाद मुद्दे निश्चित करण्यापूर्वी कागदपत्रे दाखल केली पाहिजेत. तथापी दावा विषयीसंबंधी अशी कागदपत्रे अथवा दस्तऐवज दाव्यातील पक्षकार न्यायालयाने वाद मुद्दे निश्चित करण्यापूर्वी त्यास दाखल करता आले नाहीत ते कागदपत्र सदर पक्षकार यांना सुनावणीदरम्यान करता येऊ शकतात, मात्र योग्य त्या टप्प्यावर ते कागदपत्र त्यांना दाखल का करता आले नाहीत याबाबत त्यांच्या अर्जात कारणे नमुद करून तो अर्ज दाखल केला पाहिजे. अर्थात नमुद केलेल्या कागदाबाबत न्यायालयाचे समाधान झालेस दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ८ नियम १(अ)(३) अन्वये न्यायालयाच्या परवानगीने दाखल करता येऊ शकतात.

६. प्रस्तुत दाव्यातील अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. ३ यांना दिनांक ०१/०९/१९९९ रोजी दावा परिच्छेद क्र. १ड मध्ये नमुद मिळकतीचे खरेदीपत्र हे बेकायदेशीर व रद्दबातल आहे असे ठरवून मिळणेसाठी तसेच निरंतर मनाई ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी प्रस्तुत अर्जाद्वारे जे कागदपत्र हजर करु इच्छीतात त्यामध्ये वादी व पवन कुमार खिचडे यांचे दरम्यान दिनांक १४/०२/२०२० रोजी झालेल्या खरेदीपत्राची सही शिक्याची प्रत तसेच त्याअनुषंगाने झालेला फेरफार व ७/१२ हे कागदपत्र दाखल करू इच्छीतात. प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी जे कागदपत्र दाखल करू इच्छीतात त्याचे अवलोकन केले असता सदरचे कागदपत्र हे या दाव्याच्या अंतिम निर्णय होण्याच्या दृष्टीने महत्वाचे वाटतात. सदर कागदपत्र दाखल करण्याची प्रतिवादी यांना परवानगी दिली नाही तर प्रकरणांचे बाहुल्य वाढण्याची शक्यता आहे. तसेच सदरचा अर्ज मंजूर करणे हे प्रस्तुत दाव्यास न्यायनिर्णयाद्वारे अंतिम स्वरूप प्राप्त होण्याच्या दृष्टीने गरजेचे आहे . अशापरिस्थितीमध्ये प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. तसेच कागदपत्र दाखल करून घेतले म्हणजे ते शाबीत झाले असे नाही. ते शाबीत करण्याची जबाबदारी प्रतिवादी यांची आहे. परंतू प्रस्तुतचे कागदपत्र दाखल करण्यास प्रतिवादी यांना विलंब

झालेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करत असताना प्रतिवादी यांच्यावर खर्च बसविणे न्यायोचित होईल. त्यामुळे न्यायाचा समतोल साधला जाईल. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

**१.** प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र. १०८ रक्कम ₹३००/– वादी यांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

**२.** प्रतिवादी यांनी खर्च रक्कम ₹३००/– वादी यांना दिल्यानंतर कागदपत्रे दाखल करून घेण्यात येतील.

**३.** अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ठ करण्यात येतो.

Chaitanya Sunildatta Deshpande
Digitally signed by Chaitanya Sunildatta Deshpande
Date: 2021.02.15 10:42:50 +0530

**दिनांक १२/०२/२०२१** **( सी. एस. देशपांडे )**

**सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पेठ–वडगांव.**